शुद्धीपत्रक

कृपया १.०५.२०२४ रोजी सरस्वती एस आर ए को-ऑप- हाऊसिंग सोसायटीची वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या जाहीर नोटीस मध्ये सदनिका क्रमांक १०३,एच विंग ऐवजी सदनिका क्रमांक १०२, एच विंग आहे तसे वाचावे आणि इतर तपशील तसेच राहतात.

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस जाहीरपणे सूचना देण्यात येत आहे की माझे अशील अर्थात **श्री हरीश अर्जुन कालरो आणि श्री शशि अर्जुन कालरो** हे खालील विवरणित प्रमाणे बंदर रोड, शिवडी (पू), मुंबई-४०० ०१५ येथील मिनर्व्हा प्रीमायसेस सीएसएल, नावाच्या सोसायटीच्या इमारतीमध्ये बी विंग, तळ मजल्यावरील अनुक्रमे यूनिट क्र. बी२ आणि बी३ चे मालक आहेत आणि सदर मालमत्तेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :

मिनर्व्हा प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. यांचे द्वारे जारी शेअर प्रमाणपत्र क्र. १३ अंतर्गत विशिष्ट शेअर क्रमांक १४८९ ते १५६८ (दोन्ही समाविष्ट) धारक प्रत्येकी रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) चे ८० (ऐंशी) पूर्ण भरणा केलेले शेअर्स

सह एकत्रितपणे

मोजमाप १२५४ चौ.फू. कारपेट एरियाचे यूनिट क्र. बी२. मिनर्व्हा प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. यांचे द्वारे जारी शेअर प्रमाणपत्र क्र. ११० अंतर्गत विशिष्ट शेअर क्रमांक १३४१ ते १४३० (दोन्ही समाविष्ट) धारक प्रत्येकी रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) चे ९० (नव्वद) पूर्ण भरणा केलेले शेअर्स

सह एकत्रितपणे

मोजमाप १४०४ चौ.फू. कारपेट एरियाचे यूनिट क्र. बी३. मालक यांचेकडून खालील विवरणित असे मूळ करार हरविले आहे/गहाळ झाले आहे :

१. डेव्हलपर आणि श्री ए. व्ही. उदाणी यांचे दरम्यान क्रियान्वित यूनिट बी२ चे मूळ करार

२. श्री ए. व्ही उदाणी आणि श्री रवी सी. मनसुखानी आणि इतर यांचे दरम्यान क्रियान्वित यूनिट बी२ चे मूळ करार.

३. डेव्हलपर आणि श्री एच. व्ही. उदाणी यांचे दरम्यान क्रियान्वित यूनिट बी३ चे मूळ करार

४. श्री एच. व्ही. उदाणी आणि श्रीमती एच.सी. मनसुखानी यांचे दरम्यान क्रियान्वित यूनिट बी३ चे मूळ करार

जे आता खूप शोधूनही सापडलेले नाहीत आणि मालक यांनी यासंदर्भात माहिम पोलिस स्टेशन, मुंबई येथे रजिस्टर क्र. ५१३०८-२०२४ अंतर्गत पोलिस तक्रार देखील दाखल केली आहे.

कोणीही पक्ष किंवा व्यक्ती ज्यांना याबाबत कोणतीही माहिती असेल किंवा वरील नमूद करार ताब्यात असतील किंवा विक्री, गहाण, प्रभार, भाडेपट्टा, ग्रहणाधिकार, असाइनमेंट, उप-भाडेपट्टा किंवा वरील नमूद करार आधारे सदर फ्लॅट किंवा त्यातील कोणत्याही भाग संदर्भात कोणत्याही स्वरूपातील किंवा अन्यथा कोणताही प्रकारचा कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध किंवा दावा असेल किंवा तसा दावा असेल तर त्यांना याद्वारे विनंतीपूर्वक कळविण्यात येत आहे की त्यांनी सदरहू सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून १४ दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीदारांना त्यांच्या गोपाल पालव ॲण्ड असोसिएट्स, कार्यालय क्र. १, जयकुमार एजंसी, सरस्वती महल कम्पाउंड, रानडे रोड आणि शिवसेना भवन पथ जंक्शन, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८ येथील कार्यालय पत्त्यावर संबंधित कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात याची माहिती द्यावी अन्यथा कोणत्याही दाव्यास सोडून दिले/माफ केले/त्याग केले किंवा समर्पित केले, असे मानले जाईल.

ठिकाण : मुंबई **स्वाक्षरी/-**
दिनांक : ०७.०५.२०२४ **सनी रजक**
ॲडव्होकेट हायकोर्ट

मुंबई येथील लघु वाद न्यायालयातील (वांद्रे शाखा)

आर.ए.डी. वाद क्र. ३५८ सन २०२२

१. श्री. सत्यनारायण बोधीराम गुप्ता, वय: ६४ वर्षे, पेशा: निवृत्त.]
२. प्रितम सत्यनारायण गुप्ता, वय: ३५ वर्षे, पेशा: नोकरी,]
३. श्री. गौतम सत्यनारायण गुप्ता, वय: ३१ वर्षे, पेशा: नोकरी,]
सर्व भारतीय रहीवासी, राहणार - खोली क्र. ९, दर्शन चाळ, मारवाडी कंपाऊंड, आरे रोड, गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४.]

... **वादी**

वि.

१. सुरेश सत्यनारायण राय]
वय: माहीती नाही, पेशा: माहीती नाही, एक प्रौढ भारतीय रहिवासी, राहणार - भागेश्वरी सॅटेलाईट टॉवर, ४ था मजला, खोली क्र. ४०४, गोकुळधाम, गोरेगाव (पूर्व), मुंबई- ४०००६३.]

... **प्रतिवादी**

प्रति,

उपरिनामित प्रतिवादी,

ज्याअर्थी, उपरिनामित वादींनी प्रतिवादींविरुध्द वाद दाखल करून त्यात विनंती केली की, खोली क्र. ९, दर्शन चाळ, मारवाडी कंपाऊंड, आरे रोड, गोरेगाव (प.), मुंबई-४००१०४ ह्या वादग्रस्त जागेच्या संबंधात वादी यांना कायदेशीर भाडेकरू घोषित करावे आणि अशा अन्य व पुढील अनुतोषांसाठी.

आदेश आणि हुकूम द्यावेत.

तुम्हाला याद्वारे समन्सच्या बजावणीपासून ३० दिवसांत तुमचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी आणि उपरिनामित वादींना उत्तर देण्यासाठी **१२ जून, २०२४ रोजी दु. ०२.४५ वा.** व्यक्तीशः किंवा रितसर निर्देश दिलेल्या आणि वादाशी संबंधित सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा प्राधिकृत वकिलामार्फत किंवा जी अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा अन्य व्यक्ती सोबत न्यायालय खोली क्र. ३४, ६ वा मजला, लघु वाद न्यायालय, अनंत काणेकर मार्ग, भास्कर बिल्डिंग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथील पीठासिन सन्माननीय न्यायाधिशांसमोर हजर होण्यासाठी समन्स बजावण्यात येते, आणि तुम्ही हजर होण्यासाठी ठरवलेल्या दिवशी वादाचा अंतिम निकाल दिला जाणार असल्याने तुम्ही तुमचे सर्व साक्षीदार त्या दिवशी हजर करण्याच्या तयारीत असावे आणि तुमच्या बचावाच्या पुष्ट्यर्थ ज्यावर विसंबून राहू इच्छिता असे कोणतेही दस्तावेज तुम्ही बरोबर आणावेत किंवा तुमच्या वकिलामार्फत पाठवावेत आणि याद्वारे तुम्ही सूचना घेणे आवश्यक आहे की, लेखी निवेदन सादर करण्यात किंवा अगोदर सांगितलेल्या दिवशी तुम्ही हजर होण्यात कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत वादावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल आणि तुम्ही ही सूचना देखील घ्यावी की, आधी सांगितलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी बजावणीसाठी पत्ता दिला नाहीत तर तुमचा बचाव खोडून काढण्यासाठी तुम्ही जबाबदार असाल.

सदर वाचाची प्रत तुम्हाला ह्या न्यायालयाच्या **न्यायालय खोली क्र. ३४** मधून मिळू शकेल.

न्यायालयाच्या शिक्क्याने ह्या २७ मार्च, २०२४ रोजी दिले.

शिक्का

सही/-
(आर. के. हजारे)
अतिरिक्त प्रबंधक

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०३/०५/२०२४

जाहीर सूचना

सूचना देण्यात येते की, आम्हाला आमचे अशील यांच्याद्वारे सूचित व प्राधिकृत केले आहे की, श्री. रविंद्रनाथ शंकर नायर व श्रीम. उशा रविंद्रनाथ शंकर नायर **(मालक)** यांच्या सदर मालमत्तेच्या संबंधात (खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत) मालमत्तेची मालक व आमचे अशील यांच्या दरम्यान सदर मालमत्तेची विक्री करण्याकरिता बोलणी करण्याकरिता अप्रभारित हक्क, दावे व हितसंबंध यांची पडताळणी करावी.

कोणाही व्यक्तीस/ संस्थांना जर सदर मालमत्ता वा कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध, आक्षेप व/वा मागण्या काही असल्यास तसेच वारसा, शेअर, विक्री, गहाण, अभिहस्तांकन, अदलाबदल, धारणाधिकार, परवाना, हक्क करार जमा, देणगी, भेट, जप्ती, ताबा, वहिवाट, उप-वहिवाट, लीव्ह ॲन्ड लायसन्स, भाडेकरार, उप-भाडेकरार, हक्कांचे हस्तांतरण वा लाभार्थी हक्क कोणतेही ट्रस्ट, देखभाल, देणगी, जप्ती, कौटुंबिक व्यवस्था/ सेटलमेंट, खटला, कोणत्याही न्यायालयाचे आदेश, कोणत्याही न्यायालयाचे हुकूम वा अडथळे काही असल्यास त्यांनी याद्वारे अधोहस्ताक्षरित यांना लेखी स्वरूपात १४ (चौंदा) दिवसांच्या आत (दोन्ही दिवस समाविष्ट) लेखी स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून त्यांचे दावे व/वा आक्षेप, काही असल्यास सर्व संबंधित दस्तावेज प्रमाणित प्रत यांच्यासह सूचित करणे आवश्यक आहे अन्यथा मालक यांचे हक्क सदर मालमत्तेच्या संबंधात अधित्यागीत मानले जातील व अडथळे वा दावे व/वा आक्षेप, काही असल्यास सदर व्यक्तींचे/ संस्थांचे अधित्यागीत मानले जातील.

कृपया नोंद घ्यावी की, कोणतेही आक्षेप/ दावे, जर काही असल्यास लेखी स्वरूपात दस्तावेज (नोटरीकृत मूळ प्रत यांच्यासह) नोंदणीकृत ए.डी. पोस्ट मार्फत पाठवावे व सदर आक्षेप/ दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

अनुसूची

(सदर मालमत्ता)

रहिवासी जागा धारक फ्लॅट क्र. सी, तळ मजला मोजमापित ६४९ (सहाशे एकोणपन्नास) चौरस फूट चटई क्षेत्रफळ इमारत रॉक व्ह्यू ऑफ रॉक व्ह्यू अपार्टमेंट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, बिल्डींग १४, राघवजी रोड, ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई ४०० ०३६ येथे ०५ (पाच) संपूर्ण प्रदानित शेअर्स असलेल्या रु. ५०/- (रु. पन्नास मात्र) प्रत्येकी विभिन्न क्र. ११ ते १५ (दोन्ही समाविष्ट) शेअर प्रमाणपत्र धारक क्र. ०३ अंतर्गत रॉक व्ह्यू अपार्टमेंट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड यांच्याद्वारे जारी.

दि. ७ मे, २०२४

सही/-
वकील अजित एन. मक्खीजानी
एम एम लीगल असोसिएट्स
वकील व सल्लागार
चेंबर : लँडमार्क प्लॅटिनम, कार्यालय क्र. ११०१, ११ वा मजला, जंक्शन ऑफ ३४ वे रोड व एस. व्ही. रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५०, भारत.
दूर. +९१ ८४५४८८१००७
+९१ ८४५४८४१००७
ईमेल : ajit.mmla@gmail.com

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई येथील खंडपीठा समोर
कंपनी योजना अर्ज क्र. २३ सन २०२४
शी संबंधित
कंपनी योजना याचिका
क्र. ५२ सन २०२४

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ ची कलमे २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या अन्य प्रयोज्य तरतुदींच्या प्रकरणात
आणि

सोईर ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड, पहिली हस्तांतरक कंपनी
आणि
डामास गोल्ड फिल्डस् ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड, दुसरी हस्तांतरक कंपनीच्या **डेमास ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,** हस्तांतरीती कंपनी शी आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या प्रकरणात **सोईर ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,**
कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींन्वये स्थापित एक कंपनी जीचे नोंदणीकृत कार्यालय आहे. ००२, विनय नगर बिल्डिंग नं. ९ सीएचएस लि., प्लेझंट पार्क समोर, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पू), ठाणे - ४०११०६

..... पहिला याचिकाकर्ती कंपनी
आणि

डामास गोल्ड फिल्डस् ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींन्वये स्थापित एक कंपनी, जीचे नोंदणीकृत कार्यालय आहे. -००२, विनय नगर बिल्डिंग नं. ९ सीएचएस लि., प्लेझंट पार्क समोर, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पू), ठाणे -४०११०६.

..... दुसरी याचिकाकर्ती कंपनी
आणि

डेमास ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींन्वये स्थापित एक कंपनी, जीचे नोंदणीकृत कार्यालय आहे. -००२, विनय नगर बिल्डिंग नं. ९ सीएचएस लि., प्लेझंट पार्क समोर, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पू), ठाणे -४०११०६.

..... तिसरी याचिकाकर्ती कंपनी

याचिकेची सूचना

सोईर ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड, पहिली हस्तांतरक कंपनी आणि **डामास गोल्ड फिल्डस ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,** दुसरी हस्तांतरक कंपनीच्या **डेमास ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड,** हस्तांतरीती कंपनी शी आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या एकत्रिकरणाच्या योजनेत अंतर्भूत व्यवस्थेच्या मंजुरीसाठी कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ अन्वये एक संयुक्त याचिका राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई समोर सादर केली होती. ०२ एप्रिल, २०२४ रोजी नामदार न्यायाधिकरणाने वरील याचिका दाखल करून घेतली आणि १६ मे, २०२४ रोजी कंपनी प्रकरणे हाताळणाऱ्या सन्माननीय सभासदासमोर त्यावर सुनावणी होणार आहे. सदर याचिकेला समर्थन देण्यास किंवा विरोध करण्यास कोणीही इच्छुक असल्यास त्यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना त्यांच्या हेतुची सूचना त्यांच्या किंवा त्यांच्या वकिलांच्या सहीने याचिकेच्या सुनावणीसाठी ठरवलेल्या उपरोक्त तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर विरोधाची कारणे किंवा प्रतिज्ञापत्राच्या प्रतीसह पाठवावी.

याचिकेची एक प्रत ती पाहीजे असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्यासाठीचे विहित शुल्क प्रदान केल्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडून पुरवली जाईल.

दिनांक : ७ मे,२०२४

श्री. चंद्रकांत म्हाडेश्वर
याचिकाकर्त्या कंपन्यांसाठी वकील
ऑफीस नं. ९, बाऊना कासा बिल्डिंग, ३ रा मजला, पी एम रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१

ADITYA BIRLA CAPITAL प्रोटेक्टिंग इन्व्हेस्टिंग फायनान्सिंग ॲडव्हायझिंग

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन कंपाऊंड, वेरावळ, गुजरात ३६२२६६
शाखा कार्यालय: आर-टेक पार्क, १० वा मजला, निरलॉन कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेसवे लगत, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३.

जोडपत्र-IV-A
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदी सहवाचता नियम ८(६) पहा)
स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (५४ सन २००२) च्या नियम ९(१) च्या तरतुदी सहवाचता नियम ८(६) च्या सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठीची ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार आणि गहाणदार यांना सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड/तारण धनकोंकडे गहाण आहे जिचा प्रत्यक्ष कब्जा आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार आणि गहाणदार म्हणजेच **श्री. मयुर नगिनदास शाह, श्रीम. हंसा शाह, मे. डी.बी. एंटरप्रायजेस एनएक्स आणि मयुर सुपर मार्केट** यांच्याकडून तारण धनको यांना थकीत मुद्दल, थकबाकी रक्कम (उपर्जित प्रलंबित प्रभार समाविष्टीत) आणि ०९.०९.२०२१ पर्यंत व्याज (सदर रक्कम टीडीएस गणना आणि पूर्व-प्रदान प्रभार, प्रयोज्य नुसार) आणि वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज आणि इतर खर्च या रकमे करिता **एकूण रु. ३,९१,६१,२९६/- (रूपये तीन करोड एक्क्याण्णव लाख एकसष्ट हजार दोनशे शहाण्णव मात्र)** वसुलीकरिता **२८.०५.२०२४ रोजी** ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्वाने लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहे.

दोन्ही प्लॅट्ससाठी एकूण राखीव किंमत **रु. २,३१,३१,३५०/- (रुपये दोन करोड एकतीस लाख एकतीस हजार तीनशे पन्नास मात्र)**, जिचे तपशीलवार विभाजन प्रत्येकी प्लॅटच्या ईअर रकमेसह पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

फ्लॅट क्र.	राखीव किंमत (रू. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रू. मध्ये)
फ्लॅट क्र. ४०१, ४था मजला, ए विंग, मॅजेस्टिक हाईट्स	१,१५,६५,६७५/-	११,५६,५६७.५०/-
फ्लॅट क्र. ४०२, ४था मजला, ए विंग, मॅजेस्टिक हाईट्स	१,१५,६५,६७५/-	११,५६,५६७.५०/-
एकूण	**रू. २,३१,३१,३५०/-**	**रू. २३,१३,१३५/-**

मिळकत तपशिल खाली वर्णन

१) फ्लॅट क्र. ४०१, ४था मजला, ए विंग, मॅजेस्टिक हाईट्स, गट क्र. २०३, सीवूड्स, नवी मुंबई - ४००७०६

२) फ्लॅट क्र. ४०२, ४था मजला, ए विंग, मॅजेस्टिक हाईट्स, गट क्र. २०३, सीवूड्स, नवी मुंबई - ४००७०६

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ तारण धनकोंची वेबसाईट म्हणजेच **https://morgagefinance.adityabirlacapital.com /Pages/individual/properties-for-auction-under-sarfaesi-act.aspx** किंवा **https://sarfaesi.auctiontiger.net** मध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

दिनांक : ०७.०५.२०२४ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण: मुंबई **आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड**

SBI State Bank of India

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट ब्रांच-II, रहेजा चेंबर्स, तळ मजला, विंग-बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१. **दूरध्वनी:** २२८१ १४८५, **फॅक्स:** २२८१ १४०१, **ईमेल:** sbi.15859@sbi.co.in,

कब्जा सूचना (नियम-८(१) (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **स्टेट बँक ऑफ इंडिया, स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट शाखा II, मुंबई** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३ (१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **०७.११.२०२३** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **मे. फेमस स्टेशनरी प्रायव्हेट लिमिटेड आणि हमीदार म्हणजेच श्री. जयंती मेघराज जी मेहता, श्री. आशिष जयंतीलाल मेहता, श्रीम. आरती आशिष मेहता आणि श्रीम. रसिला मेहता (मयत असल्यापासून) द्वारे त्यांचे कायदेशीर वारसदार श्री. जयंती मेघराज जी मेहता** (पती आणि कायदेशीर वारसदार), **श्री. आशिष जयंतीलाल मेहता (मुलगा आणि कायदेशीर वारसदार) आणि इतर कायदेशीर वारसदार** यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम **०६.११.२०२३** रोजीप्रमाणे **रु. १९,३२,७१,९५०.२१/- (रुपये एकोणीस कोटी बत्तीस लाख एकाहत्तर हजार नऊशे पन्नास आणि पैसे एकवीस मात्र)** त्यासह उपरोक्त रकमेवर वेळोवेळी बँक/आरबीआय द्वारे विहित केल्यानुसार आणि/किंवा मासिक आधारे चक्रवाढीने कंत्राटी दराने पुढील व्याज सह प्रदानाच्या तारखेपर्यंत अनुषंगिक परिव्यय, प्रभार आणि खर्चाची परतफेड सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार/हमीदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार, हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा सदर ॲक्टच्या कलम १३ चे उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये ह्या **२ मे, २०२४** रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा स्टेट बँक ऑफ इंडियाकरीता रक्कम **रु. १९,३२,७१,९५०.२१/- (रुपये एकोणीस कोटी बत्तीस लाख एकाहत्तर हजार नऊशे पन्नास आणि पैसे एकवीस मात्र)** व्याजासह एकूण थकबाकी चुकती करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, कसूर केल्यास तारण मिळकत/ती नियोजनानुसार विकण्यात येईल.

दिनांक : मे ०७, २०२४ **सही/- प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

ICICI Bank **शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लि., तळ मजला, आकृती सेंटर, एमआयडीसी, टेलिफोन एक्स्चेंज जवळ, आकृती स्टार समोर, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३

जाहीर सूचना

कर्जदार आणि तमाम जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, तारण धनको-आयसीआयसीआय बँक लिमिटेड सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(५), पोट नियम ९ अंतर्गत खालील नमुद तारण मिळकत/ती विकण्यासाठी प्रस्तावित आहे.

अ. क्र.	कर्जदारांचे नाव	तारण मत्ता/अंमलयोग्य मत्तेचा पत्ता	थकबाकी रक्कम जुलै २५, २०२३ रोजीस
१.	अल्केश एकनाथ शिंदे (कर्जदार) रेणुका अल्केश शिंदे (सह-कर्जदार) खाते क्र.- एलबीटीएनई०००००५२४८६२३	फ्लॅट क्र. ए-५०४, ५वा मजला, ए विंग, प्रथमेश प्राईड सीएचएसएल, प्लॉट क्र. ६, सेक्टर १९, गाव उलवे जीईएस स्कीम, उलवे, नवी मुंबई ४१०२०६ मोजमापित क्षेत्र ४३.१५ चौ. मीटर्स बिल्ट अप क्षेत्र + २.०४ चौ मीटर्स टेरेस)	रु. ५२,०३,५१६/- (मे ०३, २०२४ रोजीस)

तारण धनको-आयसीआयसीआय बँक लिमिटेड ने खाजगी कराराने दिनांक **मे २८, २०२४** रोजी सदर मिळकत/ती निकाली काढण्याचे ठरविले आहे. विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सिक्युरिटायझेशन ॲक्ट (सरफैसी) च्या कलम १३(१३) नुसार कोणत्याही बाबतीत तारण/ गहाण मिळकत/तींसह व्यवहार न करण्यासाठी सावधान आणि प्रतिबंध करण्यात येत आहे आणि मिळकत/तींसह केलेला कोणताही व्यवहार हा त्यावरील पुढील व्याज आणि रकमेकरिता आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील. गहाणवटदार/नोटीसी यांना **मे २७, २०२४ रोजी दु. ०२.०० वा.** पूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी चुकती करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, कसूर केल्यास तारण मिळकत/ती नियोजनानुसार विकण्यात येईल.

दिनांक : मे ०७, २०२४ **सही/- प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, १. करार दि. २३ जुलै, २०११ धारक नोंदणीकरण क्र. बीडीआर-४/६८८८/२०११ अंतर्गत मे. एसएमजीके कन्स्ट्रक्शन्स व दिवंगत बेरना फ्रांको ए.के.ए. बनदित्ते फ्रांको यांच्या दरम्यान २. शेअर प्रमाणपत्र क्र. ००८ जे १० शेअर्स संबंधात विभिन्न क्र. ७१ ते ८० (दोन्ही समाविष्ट) धारक फ्लॅट क्र. ३०३, ३ रा मजला, अंबोवली नील कमल को-ऑप. हा. सो. लि., सीजर रोड, सेंट ब्लैस शाळेच्या पुढे, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५८ येथील करार गहाळ झाले आहेत/ हरवले आहेत व भरपूर शोधूनही सापडत नाही आहेत. शेअर प्रमाणपत्र बेरनल फ्रांको यांच्या नावे होते त्यांचा मृत्यू दि. २९.०१.२०१६ रोजी झाला त्यांच्या मागे १. टेरेंस फ्रांको (मुलगा) २. नील एडवीन फ्रांको (मुलगा), ३. जुदे फ्रांको (मुलगा), ४. कैथ थॉमस डिसुझा (जावई) व ५. राल्फ एरिक डिसुझा (नातू) हे केवळ त्यांचे कायदेशीर वारस आहेत. श्री. कैथ थॉमस डिसुझा यांनी सदर फ्लॅटमधील त्यांचे शेअर्स सदर फ्लॅटमधील त्यांचा मुलगा श्री. राल्फ एरिक डिसुझा यांच्या नावे रिलीज्ड/ हस्तांतरण केले. १. टेरेंस फ्रांको, २. नील एडवीन फ्रांको ३. जुदे फ्रांको व ४. राल्फ एरिक डिसुझा यांनी सदर फ्लॅट व शेअर्स चे हस्तांतरण करण्याकरिता त्यांच्या नावे सोसायटीस अर्ज दिला आहे व सदर फ्लॅट व शेअर्स मधील ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र करण्याकरिता ते सर्व अडथळे यांच्यापासून मुक्त आहेत.

सर्व व्यक्तींना सदर वरील फ्लॅट संबंधात कोणतेही दावे असल्यास तसेच करार, कंत्राट, एमओयू वा प्रभार, धारणाधिकार, आवंटन, गहाण, न्यास, ताबा, हस्तांतरण, विक्री, अदलाबदल, भेट, वारसा, सुविधाधिकार वा जप्ती वा कर्ज वसुली, परवाना, देणगी, शेअर,देखभाल, कोणत्याही न्यायालयाचे आदेश वा हुकूम, कोणतेही दायित्व वा अन्य काही असल्यास त्यांनी अधोहस्ताक्षरितांना निर्देशित पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत संबंधित दस्तावेजांसह व अन्य पुरावे यांच्यासह लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदर फ्लॅट व शेअर्स सर्व अडथळ्यांपासून मुक्त असल्यास कोणत्याही संदर्भाविना व सदर दावे सर्व अडथळे वा दावे वा आक्षेप काही असल्यास सदर व्यक्तींचे ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र सदर अंबोवली नील कमल को-ऑप. हा. सो. लि. यांच्याद्वारे सोसायटीच्या कायद्या अंतर्गत प्रदानित स्वरूपात १. टेरेंस फ्रांको, २. नील एडवीन फ्रांको ३. जुदे फ्रांको व ४. राल्फ एरिक डिसुझा यांच्या नावे करण्यात येतील व कोणाही व्यक्तींचे दावे वा आक्षेप असल्यास ते १४ दिवसांच्या आत न मिळाल्यास अधित्यागीत/ परित्यागीत मानले जातील.

दि. ६ मे, २०२४

सही/-
श्रीम. स्वाती एस. गाला व कु. हेटवी गाला
वकील, उच्च न्यायालय, गोल्ड कॉईन अपार्टमेंट्स, वाकोला चर्चसमोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०५५.

ठिकाण : मुंबई दि. ०७.०५.२०२४

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई येथे
एमटीएनएल भवन, ३रा मजला, स्ट्रॅण्ड रोड, अप्पोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई ४००००५.
मूळ अर्ज क्र. ३४० सन २०२२ **परि १२**
समन्स

युनियन बँक ऑफ इंडिया ...**अर्जदार**
विरुद्ध
सुरेश विश्वनाथन ..**प्रतिवादी**

ज्याअर्थी, वरील नमूद **ओ.ए. क्र. ३४० सन २०२२** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१७.०८.२०२२** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन त्यामधील रक्कम **रू. ६२,३३,९९७.५२** या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. ज्याअर्थी, सर्व सामान्य पद्धतीने समन्स/सूचनेची बजावणी होऊ शकली नाही आणि ज्याअर्थी पर्यायी बजावणी साठी अर्जाच्या मंजुरी न्यायाधिकरण द्वारे मंजुरी दिली आहे. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज इ.).

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या ३० (तीस) दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकत